आ. सुधीर मुनगंटीवार
अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश

जावक क्रमांक : ३४/ मार्च /२०११

मा. ना. श्री. दिलीप वळसे पाटील
अध्यक्ष, विधानसभा
महाराष्ट्र शासन
मुंबई -३२

सप्रेम नमस्कार

विषय :- वर्धा येथील अशासकीय संस्थेतर्फे पेंच व्याघ्र प्रकल्प, बोर अभयारण्य, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात करण्यात आलेल्या ४-५ कोटी रुपयांच्या कामाबाबत.

संदर्भ :- १) माझे पत्र दिनांक ३०/०८/२०११
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक, म.रा. नागपूर यांना लिहिलेले पत्र दि. २१/०८/१०
३) माझे पत्र क्र. २८४, दिनांक १५/०१/२०१०
४) माझे पत्र क्र. १०२२, दिनांक २४/६/२०१०

महोदय

संदर्भिय विषयाच्या बाबतीत मी गेली १ वर्षाहून जास्त काळापासून वनविभागाशी पत्रव्यवहार करीत आलेलो आहे. संदर्भिय पत्र क्र. १, २ व ३ वरुन आपल्याला स्पष्ट होईल की, स्थानिक आमदार व एका राष्ट्रीय पातळीवर पक्षाच्या नेत्याला सुध्दा उत्तर देण्याची वनविभागाची मानसिकता नाही. त्यामूळे मी मा. वनमंत्री यांना सुध्दा दिनांक ३०/०८/२०१० ला पत्र लिहिलेले होते. परंतु त्याबाबत उत्तर मिळाले नाही. तसेच वनविभाग प्रमुखाकडूनही उत्तर प्राप्त झालेले नाही. केवळ दिनांक ३०/०९/२०१० रोजी केवळ मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर यांचेकडून मला पत्र प्राप्त झाले. त्या पत्रातील मजकूर मी उपस्थित केलेल्या मुद्यांना धरुन नाही. तसेच त्या पत्रोत्तराशी विभागप्रमुख सहमत आहेत का याचाही बोध होत नाही. कारण मुळात मी पत्र प्रधान मुख्य वनसंरक्षक यांना लिहिलेले होते. परंतु त्यांनी जाणूनबुजून कनिष्ठ अधिकाऱ्यांकडून उत्तर पाठविले ही बाब अतिशय अनियमितपणाची व संतापजनक आहे.

यानंतर सदर संकुलांच्या बांधकामामध्ये झालेला अनियमितपणाबाबत विधानसभेत लक्षवेधी सुध्दा उपस्थित करण्यात आलेली होती. त्यालासुध्दा विसंगत उत्तर देण्यात आले आहे. वास्तविक विधानसभेत अशाप्रकारे दिशाभूल करणारी उत्तरे देवून संबंधित अधिकाऱ्यांनी हक्कभंग केला आहे

कार्यालय : सीडी.ओ. बरॅक नं.१, वसंतराव भागवत चौक, योगक्षेमसमोर, नरिमन पॉइंट, मुंबई-४०००२०
दूरध्वनी : २२०२२०५०/२२०४८६८७ फॅक्स : २२८५२३०५ सचिव : मोबाईल : ९८२२५६५९२६
चंद्रपूर : भाग्यश्री, गोल बाजार वार्ड, चंद्रपूर-४४२४०१. दूरध्वनी : ऑफिस (०७१७२) २५२५८२, २५६०६९, फॅक्स : २५८८००.
Email : sudhirmungantiwar@yahoo.co.in / ajaydhawane@gmail.com

आ. सुधीर मुनगंटीवार
अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश

जावक क्रमांक :

असे माझे मत आहे. त्याबाबत पुढील वैधानिक कार्यवाही करणेपूर्वी मी पुन्हा एकदा माझे मुद्दे आपणासमोर मांडू इच्छितो जेणेकरुन आपणाकडून योग्य चौकशी होईल. दोषी अधिकाऱ्यावर कार्यवाही करणे आपल्याला सोईस्कर होईल.

सदर बांधकामाबाबत ज्या अनियमितता झाल्या आहेत, त्या मी आपणासमोर ठेवू इच्छितो. त्या मुद्यासंबंधित चौकशी करुन विभागप्रमुखांच्या मार्फत चौकशी अहवाल आपणाकडे येईल अशी आशा मी बाळगतो.

**१) पर्यटन संकुल बांधकामातील आर्थिक अनियमितपणा :-**

वनविभागातर्फे सन २००८-०९ मध्ये ताडोबा, पेंच, बोर येथील व्याघ्र प्रकल्प व अभयारण्याच्या कोअर झोनमध्ये नियमबाह्यरित्या कोट्यावधी रुपयांची पर्यटन संकुलाची बांधकामे करण्यात आली. त्यामध्ये ८-९ महिने पाठपुरावा केल्यावर मला जे पत्र प्राप्त झाले त्यावरुन खालील बाबी स्पष्ट होतात. त्याला सहपत्रीत आदिवासी विभागाचे परिपत्रक आहे, वनविभागाचे नाही.

१. भ्रष्टाचार व अनियमितपणाची तक्रार असूनही कोणत्याही प्रकारची चौकशी करण्यात आलेली नाही.
२. सदर कामामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितपणा झाले नाही असे पत्रामध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले नाही.
३. त्याबाबत वनविभागाच्या आर्थिक निकषांचे पालन झाले आहे का ह्याबाबत जाणूनबूजून उल्लेख टाळलेला आहे.
४. सदर कामे बिना निविदा करण्यात यावे असे वनविभागाचे कोणते सुचना /निर्देश आहेत?
५. ही बांधकामे अशासकीय संस्थेकडून करण्यात यावेत असे वनविभाग किंवा प्रधान मुख्य वनसंरक्षकाचे निर्देश आहेत का? अहवालात उल्लेख नाही.
६. आदिवासी विभागाच्या ज्या परिपत्रकानूसार सदरची कामे करण्यात आल्याचे दर्शविले आहे ते केवळ केंद्र शासनाच्या निर्देशानूसार व आदिम जमातीच्या व्यक्तीसाठी घरकूल योजनेकरीता आहे. सदरचे शासन परिपत्रक वनविभागाने स्विकारले आहे का? शिवाय पर्यटन संकुले ही व्यापारी तत्वावर बांधण्यात आलेली आहेत. तिथे लाभार्थी हा विचार करण्यात आलेला नाही. यावरुन सदरच्या जी.आर. चा दुरुपयोग झाल्याचे स्पष्ट दिसून येते.

कार्यालय : सी.डी.ओ. बॅरेक नं.१, वसंतराव भागवत चौक, योगक्षेमसमोर, नरिमन पॉइंट, मुंबई-४०००२०
दूरध्वनी : २२०२२०५०/२२०४८६८७ फॅक्स : २२८५२३०५ सचिव : मोबाईल : ९८२२५६५९२६
चंद्रपूर : भाग्यश्री, गोल बाजार वार्ड, चंद्रपूर-४४२४०१. दूरध्वनी : ऑफिस (०७१७२) २५२५८२, २५६०६९, फॅक्स : २५८८००.
Email : sudhirmungantiwar@yahoo.co.in / ajaydhawane@gmail.com

आ. सुधीर मुनगंटीवार
अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश

जावक क्रमांक :

७. योजना राबविणारी यंत्रणा आदिवासी विभागातील, आदिवासी उपयोजना क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थासाठी आहे. केवळ ग्रामोपयोगी विज्ञान केंद्रासाठी (दत्तपूर, वर्धा) नाही.

८. सदर योजनेतील घरकुल बांधण्यासाठी केंद्र शासनातर्फे विशेष अनुदान मंजूर करण्यात आलेले होते. त्यापेक्षा जास्ती खर्च झाल्यास तो संस्थेकडून करण्याचे प्रावधान आहे.

९. संस्थेशी झालेल्या MOU मध्ये संस्थेचा आर्थिक सहभाग असल्याची तरतूद नाही. जोडलेल्या जी.आर. नूसार तसे अपेक्षित आहे.

१०. संस्थेने सहपत्रीत जी.आर. नूसार ५% अनामत रक्कम ठेवणे आवश्यक आहे. परंतु संस्थेने तसे केल्याचे MOU वरुन दिसून येत नाही. तसेच वनविभागाच्या व बि. ॲण्ड सि. च्या नियमानूसार सुध्दा कंत्राटरादाकडून सुरक्षा रक्कम अनामत ठेवणे जरुरी असते. तसे केले गेले नाही.

११. सहपत्रीत जी.आर. नूसार कामाची गुणवत्ता बांधकाम खात्याकडून तपासली जाणे अपेक्षित आहे. संबंधित अधिकारी (सुपरव्हिजन अधिकारी मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)) यांनी सदर कामाची स्वत: किंवा बी ॲण्ड सी कडून तपासणी करुन घेतली नाही. आमच्या माहितीनूसार वनविभागाच्या अभियंत्याकडूनसुध्दा तपासणी करण्याचे जाणून बुजून टाळलेले आहे.

१२. सदर संस्थेला बांधकामाची पूर्ण किंमत १००% आगाऊ देण्यात आली, हे आदिवासी विभाग, वनविभाग तसेच बी ॲण्ड सी च्या धोरणाचे विरुध्द आहे.

१३. सदर योजना ही आदिवासी लाभार्थीसाठी होती. पर्यटकांसाठी ज्या दर्जाचे व्यावसायिक बांधकाम अपेक्षित आहे. त्याची तुलना गरीब आदिवासीसाठी करणे हे या जी.आर. चा दुरुपयोग करण्याचा प्रयत्न आहे हे उघड आहे.

१४. एकूण ४ ते ५ कोटी रुपयांच्या बांधकामासाठी शासकीय नियमानूसार वॅट (विक्रिकर), आयकर इ. नियमाप्रमाणे वसुली करुन शासकीय तिजोरीत भरणे आवश्यक होते. परंतु सदर संस्थेला कोणत्याही प्रकारची सुट नसतांना लाखो रुपयांचा विक्री कर व आयकर बुडविण्यात आला हे स्पष्ट दिसून येत असूनही त्याबाबतचा उल्लेखही उत्तरामध्ये नाही. ह्यावरुन या संपूर्ण प्रकरणातील प्रचंड अनियमितपणा झाकण्यासाठी धडपड सुरु असल्याचे स्पष्ट दिसून येते.

कार्यालय : सीटी ओ. बरॅक नं. १, बसंतराव भागवत चौक, योगक्षेमसमोर, नरिमन पॉइंट, मुंबई-४०००२०
दूरध्वनी : २२०२२०५०/२२०४८६८७ फॅक्स : २२८५२३०५ सचिव : मोबाईल : ९८२२५६५९२६
चंद्रपूर : भाग्यश्री, गोल बाजार वार्ड, चंद्रपूर-४४२४०१. दूरध्वनी : ऑफिस (०७१७२) २५२५८२, २५६०६९, फॅक्स : २५८८००,
Email : sudhirmungantiwar@yahoo.co.in / ajaydhawane@gmail.com

आ. सुधीर मुनगंटीवार
अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश

जावक क्रमांक :

**पर्यटन संकुलाचे बांधकामातील वैधानिक अनियमितपणा :-**

२) वनसंवर्धन **कायदा १९८० व वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ चे धडधडीत उल्लंघन :-**

ही पर्यटन संकुलाच्या इमारती बांधतांना स्वत: वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी वन्यजीव संवर्धन कायदा १९७२ व वनसंवर्धन कायदा १९८० चा धडधडीत उल्लंघन केलेले आहे. ह्याबाबत विधानसभेमध्ये लक्षवेधी सुचना मांडली असता त्यावर सभागृहाची दिशाभूल करणारे निवेदन सादर करण्यात आले आहे. ही खरोखरच गंभीर बाब आहे. या निवेदनातील प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

1. **१९७२ च्या वन्यजीव कायद्याच्या अंतर्गत राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण** तयार करण्यात आले असून त्यांचे निर्देश हे याअंतर्गत नियम समजण्यात येत असतात. या नियमांच्या अंतर्गत व्याघ्र प्रकल्पाचे **कोअर क्षेत्र हे मानव विरहित शांत क्षेत्र (Inviolate Area)** तयार करण्याचे अभिप्रेत आहे. या अंतर्गत व्याघ्र प्रकल्पाच्या कोर क्षेत्रातून गावे पुनर्वसन करुन बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरु आहेत. तसेच पर्यटन सुध्दा बाहेर काढण्याचे निर्देश आहेत. परंतु ह्या इमारती बांधतांना ह्या नियमांचे /निर्देशाचे उल्लंघन करण्यात येवून कोर क्षेत्रात बांधण्यात आल्या. त्यामूळे मोठ्या प्रमाणात भेट देणाऱ्या व्यक्ती व वाहने आत जाऊन वन्यजीवांना त्रास होणार आहे.
2. या इमारती बांधतांना **वनसंवर्धन कायदा १९८०** चा सुध्दा भंग करण्यात आलेला आहे. सदर बांधकामे **वानिकी कामे** या प्रकारात मोडत नसल्याने त्यांना कोणत्याही प्रकारे **वनसंवर्धन** कायद्यातून सुट मिळालेली नाही. त्यामूळे या कायद्याची सुध्दा पायमल्ली झाल्याचे उघड आहे.
3. **सदरची बांधकामे वन/वन्यजीव व्यवस्थापनाच्या दृष्टीने आवश्यक असल्यामूळे करण्यात आले असून त्याकरीता वनसंवर्धन कायद्याच्या तरतुदी आकृष्ट होत नाहीत अशी धारणा आहे असे वाक्य निवेदनात देऊन वनविभागाला आपल्याला वनकायद्याचे ज्ञान नाही असे म्हणावयाचे आहे काय?** मुळात सदरची बांधकामे ही व्यवस्थापनासाठी आवश्यक आहेत किंवा नाहीत हा मुद्दाच येथे विचाराधीन नाही. कारण सदरची बांधकामे बफरमध्ये किंवा राजस्व/खाजगी क्षेत्रात करता येणे शक्य आहे. **कोअर मध्ये सुध्दा जी कामे करता येवू शकतात, उदा. वनरक्षक नाके, संरक्षण कुटया, निरिक्षण कुट्या, वायरलेस केंद्र इ. बाबतचे नियम स्वयंस्पष्ट आहेत. (वनसंवर्धन कायदा १९८० तसेच वन्यजीव संरक्षण कायदा १९७२)**

कार्यालय : सीबी.ओ. ब्लॉक नं.१, वसंतराव भागवत चौक, योगक्षेमसमोर, नरिमन पॉइंट, मुंबई-४०००२०
दूरध्वनी : २२०२२०५०/२२०४८६८७ फॅक्स : २२८५२३०५ सचिव : मोबाईल : ९८२२५६५९२६
चंद्रपूर : भाग्यश्री, पोल बाजार वार्ड, चंद्रपूर-४४२४०१. दूरध्वनी : ऑफिस (०७१७२) २५२५८२, २५६०६९, फॅक्स : २५८८००.
Email : sudhirmungantiwar@yahoo.co.in / ajaydhawane@gmail.com

आ. सुधीर मुनगंटीवार
अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश

जावक क्रमांक :

४. त्याचप्रमाणे वन्यजीव (संवर्धन) अधिनियम १९७२ चे कलम ३३ व कलम ३५ (८) अन्वये मुख्य वन्यजीव रक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना वैधानिक अधिकार असल्याने ते वन्यजीव व्यवस्थापनाच्या हिताच्या दृष्टीकोनातून आवश्यक बाबीबाबत उपाययोजना करण्याकरीता प्राधिकृत आहेत. असे विधान करण्यात आलेले आहे.

सदरचे विधान हे अर्धसत्य असून दिशाभूल करण्याचा प्रयत्न आहे. कारण कलम ३३ (अ) अंतर्गत National Wildlife Board च्या पुर्वपरवानगीशिवाय कोणत्याही प्रकारचे व्यापारी पर्यटन संकुले, हॉटेल, प्राणीसंग्रहालये व सफारी पार्क अभयारण्यात आत घेता येणार नाहीत हे स्पष्टपणे नमूद केलेले आहे.

मुख्य मुद्दा यामध्ये असा आहे की, वनविभाग किंवा मुख्य वन्यजीव रक्षक यांना कोणत्या कलमाखाली वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ व वनसंवर्धन कायदा १९८० यांचे तरतूदीचा अपवाद असणारे अधिकार दिलेले आहेत हे कोणत्याही प्रकारे या उत्तरातून स्पष्ट होत नाही.

महोदय, या संपूर्ण विवेचनावरुन आपणाला हे स्पष्ट होईल की संबंधित वनाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र शासनाच्या व वनविभागाच्या प्रचलित नियम व कार्यपध्दतीचे संपूर्ण उल्लंघन आपल्या वैयक्तीक फायद्यासाठी करुन सदर संकुले बांधली. तसेच ही बांधकामे करतांना वनविभागाच्या कायदे व नियमांचे पालन केलेले नाही. त्याबरोबरच सभागृहात सुध्दा दिशाभूल करणारी माहिती देवून अवमान करण्याचे प्रयत्न केले आहेत.

त्यामूळे याबाबत आपणाला विनंती करण्यात येते की, आपण एक उच्चस्तरीय समिती तयार करुन त्यामध्ये केंद्रस्थ अधिकारी, विधीतज्ञ, स्थानिक लोकप्रतिनिधी यांचा समावेश करावा व अहवाल सभागृहासमोर मांडावा. सोबत मी लक्षवेधी सुचना व विभागाच्या निवेदनाची प्रत व इतर कागदपत्रे जोडलेली आहेत.

(आ. सुधीर मुनगंटीवार)
अध्यक्ष
भारतीय जनता पक्ष
महाराष्ट्र राज्य.

कार्यालय : सीसी.ओ. बरॅक नं.१, वसंतराव भागवत चौक, योगक्षेमसमोर, नरिमन पॉइंट, मुंबई-४०००२०
दूरध्वनी : २२०२२०५०/२२०४८६८७ फॅक्स : २२८५२३०५ सचिव : मोबाईल : ९८२२५६५९२६
चंद्रपूर : भाग्यश्री, गोल बाजार वार्ड, चंद्रपूर-४४२४०१. दूरध्वनी : ऑफिस (०७१७२) २५२५८२, २५६०६९, फॅक्स : २५८८००.
Email : sudhirmungantiwar@yahoo.co.in / ajaydhawane@gmail.com